ePaper

**भाऊ म्हणून मी पार्थ पवारांच्या पराभवाचा बदला घेणार": रोहित पवार!**



|| वर्ष - 7 | अंक - 334 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- एकच वादा ऋतुराज दादा..!
- अरबाजने सांगितली त्याची आणि शुराची लव्हस्टोरी
- अमरावतीमधील शाहांच्या सभेवरून राडा!


www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 24 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## हवा आणि ध्वनी प्रदूषणास कारणीभूत ठरत असल्याने

# अनधिकृत 'आरएमसी प्लॅन्ट'वर कारवाई!

## » पुनावळे आणि चिखलीत पिंपरी चिंचवड महापालिकेची पाहणी

**| पिंरी | महाईन्यूज**

**पिंपरी चिंचवड शहरात अनधिकृतपणे सुरु असलेल्या तसेच हवा आणि ध्वनी प्रदूषणास कारणीभूत ठरत असलेल्या आर.एम.सी. (रेडीमिक्स क्रॉक्रीट) प्लॅन्ट वर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी करून कारवाई करण्यात आली.**



शहरातील आर.एम.सी. (रेडीमिक्स क्रॉक्रीट) प्लॅन्ट मधून मोठ्या प्रमाणात उडणा-या धूळीमुळे नागरिकांना श्वसनाचा तसेच त्या प्रकल्पांमधून निघणाऱ्या आवाजामुळे ध्वनी प्रदूषणाचा त्रास होत असून त्याबाबत महापालिकेच्या पर्यावरण विभागास तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींची दखल घेऊन महापालिकेने मे.एस.व्ही. टी.एन.कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. तर्फे सोमानी टॉवर्स, प्लॉट नं. २५, गायकवाडनगर, पुनावळे पुणे तसेच ऐश्वर्यम हमारा, आर.एम.सी. (रेडीमिक्स क्रॉक्रीट) प्लॅन्ट चिखली येथे प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील तसेच महापालिकेकडील ना-हरकत दाखला व इतर अनुषंगिक आवश्यक असणारी परवानगी घेणे अनिवार्य असते. परंतु पाहणीवेळी ही परवानगी न घेता अनधिकृतपणे व्यवसाय चालवित असल्याचे तसेच नागरिकांनी केलेल्या तक्रारींमध्ये तथ्य असल्याचे महापालिकेच्या पथकास निदर्शनास आले आहे. पर्यावरण अभियांत्रिकी विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली २२ एप्रिल २०२४ रोजी पर्यावरण पथकातील प्रदीप महाले, जगन्नाथ काटे, बाबासाहेब ढोकळे, कनिष्ठ अभियंता स्वप्निल पाटील, मल्टिपर्पज वर्कर गोरक्षनाथ करपे तसेच एमएसएफ व मेस्को जवानांच्या पथकाने प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी करून कारवाई केली.

### फौजदारी कारवाईचा इशारा...

» पुनावळे येथील मे.एस.व्ही.टी.एन.कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. तर्फे सोमानी टॉवर्स तसेच चिखली येथील मे. ऐश्वर्यम हमारा येथे सुरु असलेला आर.एम.सी. (रेडीमिक्स क्रॉक्रीट) प्लॅन्ट सील करण्यात आला आहे.यापुढे महापालिकेच्या हद्दीत विनापरवाना व्यवसाय आणि वायू, ध्वनी प्रदूषण करत असल्याचे निदर्शनास आल्यास फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

# भाऊ पार्थ पवारच्या पराभवाचा बदला घेणार !

## » मावळ लोकसभा : वाघेरे हे नवीन खासदार असतील, आमदार रोहित पवारांना विश्वास

**| पिंपरी | महाईन्यूज |**

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी अजित पवारांना खोचक टोला लगावला आहे. श्रीरंग बारणे यांच्या विरोधात आम्ही प्रचार करून भाऊ पार्थ पवार याचा बदला घेणार आहे. अजित पवार हे पार्थ पवार याचा झालेला पराभव विसरले असतील आम्ही अद्यापही त्याचा पराभव विसरलो नाही, असे म्हणत रोहित पवार यांनी अजित पवार यांना टोला लगावला आहे. रोहित पवार हे पिंपरी-चिंचवडमध्ये पत्रकारांशी बोलत होते.

रोहित पवार म्हणाले, संजोग वाघेरे यांच्या बाजूने आजचे वातावरण आहे. वाघेरे हे नवीन खासदार असतील असा विश्वास रोहित पवार यांनी व्यक्त केला आहे. पुढे ते म्हणाले, अजित पवार हे शरद पवार यांना वडील मानायचे. त्यांना सोडून स्वतःच साम्राज्य आणि



### अजित पवार हे या सर्व गोष्टी विसरले

» पुढे ते म्हणाले, ज्या व्यक्तीने मुलाचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला. त्या गोष्टी विसरून ज्या उमेदवाराने पराभव केला त्या उमेदवाराचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अजित पवार येत असतील तर यावरूनच अजित पवारांची परिस्थिती कळून येत आहे. अजित पवार हे या सर्व गोष्टी विसरले असतील. मला पार्थला सांगायचं आहे. या गोष्टी मी विसरलो नाही. ज्या व्यक्तीने तुझा पराभव केला. त्या व्यक्तीच्या विरोधात प्रचार करण्यासाठी तुझा भाऊ इथं आलेला आहे असं शेवटी बोलताना ते म्हणाले.

कारवाईपासून लपून राहण्यासाठी महायुती आणि भाजपसोबत अजित पवार गेले आहेत. अजित पवारांनी वडिलांचा विचार केला नाही.

# ग्रामस्थाचं मत म्हणजे मंचरच्या विकासाला मत!

## शिवाजीराव आढळराव पाटील यांना पूर्ण पाठिंबा; मंचरच्या गावबैठकीत सूर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीचे शिरुरचे महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांचा मतदारसंघात जोमाने प्रचार सुरु आहे. शिवाजीराव आढळराव पाटील हे मंचर येथे गेले असता प्रत्येक ग्रामस्थाचं मत म्हणजे मंचरच्या विकासाला मत असल्याचा सुर मंचरच्या गावबैठकीत व्यक्त करण्यात आला.**



आंबेगाव तालुक्याचे सुपुत्र असलेल्या आढळराव यांना संपूर्ण पाठिंबा देण्यासाठी मंचर येथील भैरवनाथ गल्लीत बैठक पार पडली. या बैठकीत मंचर शहरातील विविध राजकीय पक्ष, शैक्षणिक संस्था, ज्येष्ठ नागरिक, व्यापारी बांधव, शेतकरी इत्यादींनी आढळराव पाटील यांना पाठिंबा देऊन मताधिक्क्याने विजयी करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या बैठकीला सर्वच जातीधर्माच्या ग्रामस्थांनी हजेरी लावली. तर उद्योजक आणि शरद बँकेचे अध्यक्ष देवेंद्र शेठ शहा, भीमाशंकरचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे आदी उपस्थित होते. यावेळी बाळासाहेब बेंडे म्हणाले की, जो विकास करतो, त्याच्यामागे पाठीमागे ठामपणे उभे राहणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. त्यासाठी आंबेगावचे सुपुत्र आढळराव पाटील यांच्यासारख्या सक्षम नेत्याला निवडून देण्याचे काम आपल्या सर्वांना करायचे आहे.

### म्हणून मंचरकर खूश राहणार

» "स्वकर्तृत्वान असलेले आढळराव पाटील यांनी आंबेगाव तालुक्याच्या विकासाचा चेहरामोहरा बदलला आहे. रामदास बाणखेले म्हणाले की, आढळराव पाटील यांनी स्वत: खासदार नसतानाही मोठ्या प्रमाणात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या माध्यमातून विकास निधी आणल्यामुळे मंचरकर खूश राहणार" असल्याचे व्ही. एस. महामुनी, सीताराम लोंडे यांनी सांगितले आहे.

# मुरलीधर मोहोळ यांचा सहाही विधानसभा मतदारसंघात प्रचाराचा धुराळा!

## विविध समाजघटकांकडून मोहोळ यांचे स्वागत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे शहर लोकसभा मतदारसंघाची अधीसूचना जारी होत असतानाच महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी यांनी सहाही मतदारसंघात पदयात्रा करून उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वीच प्रचाराचा धुराळा उडवला आहे. यातून महायुतीची असलेली वज्रमूठ मतदारांना बघायला मिळाली. शहरातील मान्यवरांच्या तसेच प्रभावशाली व्यक्ती, पक्षाचे जुने कार्यकर्ते यांच्या घरी जाऊन भेटीगाठी, विविध संस्था संघटनांच्या मेळाव्यांना उपस्थिती आणि त्यानंतर सर्वसामान्य मतदारांशी संवाद साधण्यासाठी दाटलोकवस्तीच्या परिसरात पदयात्रा करत मुरलीधर मोहोळ यांनी प्रचाराचा पहिला टप्पा पूर्ण केला आहे.**



शहरातील कोथरूड, पर्वती, शिवाजीनगर, वडगाव शेरी, कसबा आणि कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदार संघातील दाट लोकवस्तीच्या परिसरात या मतदार संवाद पदयात्रा काढण्यात आल्या होत्या. या पदयात्रांमध्ये भाजपसह महायुतीतील सर्व पक्षांचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते उत्साहात सहभागी झाले होते. यातून उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी थेट नागरीकांशी संपर्क साधला आणि श्री मोदीजींना मतदान करण्याचे आवाहन केले. विविध समाजघटकांनी मोहोळ यांचे केलेले स्वागतही चर्चेचा विषय ठरले. कार्यकर्त्यांच्या घोषणा, झेंडे, यामुळे निवडणुकीच्या वातावरणात रंग भरायला सुरूवात झाली आहे.

यात सर्व मतदार संवाद पदयात्रांमध्ये महायुतीतील पक्षाचे शहराध्यक्षांसह धीरज घाटे, आमदार, खासदार, माजी नगरसेवक, संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होत होते. हा तंत्रज्ञानाचा जमाना असल्याने बहुतेक सर्व पदयात्रांचे व्हिडिओ कार्यकर्ते स्वत:हून काढून ते व्हायरल करत होते. त्यामुळे आपल्या भागात पदयात्रा किंवा प्रचार फेरी कधी असणार याबद्दल कार्यकर्त्यांकडे विचारणा होऊ लागली आहे. या पदयात्रेच्या काळात शहराच्या विविध भागातील विविध समाज घटकातील मतदारांचा मूड लक्षात येत होता.

### पुणेकरांचा प्रतिसाद भारावून टाकणारा

» पदयात्रांची पहिली फेरी पूर्ण झाल्यानंतर मोहोळ म्हणाले, 'सहाही विधानसभा मतदारसंघात पुणेकरांचा मिळालेला प्रतिसाद मलाही भारावून टाकणारा होता. ठिकठिकाणी झालेले उत्स्फूर्त स्वागत हे भारतीय जनता पार्टी महायुती आणि पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाचे प्रतीक आहे, अशी माझी भावना आहे. विशेष म्हणजे मोदीजींची समाजाच्या सर्व घटकांत असलेल्या विश्वासाची पावतीही पदोपदी मिळाली. महत्त्वाची बाब म्हणजे आम्ही पदयात्रेत महायुती म्हणून पुणेकरांसमोर गेल्याने महायुतीतील प्रत्येक पक्षाचे प्रतिनिधित्व यात पाहायला मिळाले'.

# लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकाच वेळी शहरातील ४२ गुंड तडीपार




। पुणे । महाईन्यूज ।

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोंढवा, वानवडी, मुंढवा, हडपसर, लोणी काळभोर यासह उपनगरातील सराईत गुन्हेगारांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. परिमंडळ पाचमध्ये येणाऱ्या सात पोलीस ठाण्यातील ४२ सराईत गुन्हेगारांना पुणे, पिंपरी चिंचवडसह जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. यामध्ये चार टोळी प्रमुखांचा समावेश आहे. गेल्या काही दिवसात शहर परिसरात वाहनांची तोडफोड, जबरी चोऱ्या, घरफोड्या करणाऱ्या गुंडांनी दहशत माजविली आहे. उपनगरातील कोंढवा, मुंढवा, हडपसर, बिबवेवाडी, मार्केटयार्ड, वानवडी आणि लोणी काळभोर या भागात गुन्हेगारांची दहशत आहे. शहरातील पोलीस ठाण्याची पाच परिमंडळांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. यामध्ये सर्वाधिक मोठे कार्यक्षेत्र परिमंडळ पाचचे आहे. या भागात गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण अन्य परिमंडळांच्या तुलनेने जास्त आहे.

शहरात काही महिन्यांपूर्वी कोयता गँगने दहशत माजविली होती. सुरुवातीला हडपसर भागात कोयता गँगने दहशत माजविली होती. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील गुंडांविरुद्ध कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. परिमंडळ पाचमधील हडपसर विभाग व वानवडी विभागातील पोलीस ठाण्यांच्या हद्दीत असलेल्या गुन्हेगारांची माहिती संकलित करण्यात आली.

### तडीपारीनंतर शहरात वास्तव्य

» तडीपार कारवाई केल्यानंतर देखील अनेक सराईत शहरात वास्तव्यास आल्याचे यापूर्वी वेळोवेळी करण्यात आलेल्या कारवाईतून दिसून आले आहे. तडीपार केल्यानंतर गुंड शहरात आढळून आल्यास त्वरीत पोलीस नियंत्रण कक्ष किंवा नजीकच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## वाघेरे यांचा अर्ज भरताना महाविकास आघाडीचे जोरदार शक्तिप्रदर्शन

# तुमचे एक मत इतिहास घडविणारे ठरणार!

### अंधकार दूर करण्यासाठी मावळमधून संजोग वाघेरेंना विजयी करा; आदित्य ठाकरे

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**देशात ते चारशेपार म्हणत असले, तरी भाजप दोनशे देखील पार करणार नाही. भाजपला, गद्दारांना, महाराष्ट्र व्देष करणाऱ्यांना मतदान करणार नाही, ही भूमिका आज मतदार घेत आहेत. तुमचे एक मत इतिहास घडविणारे आणि देशातील सरकार बदलणारे ठरणार आहे. देशातील अंधकार दूर करण्यासाठी मावळ लोकसभेतून मशाल चिन्हासमोरील बटण दाबून संजोग वाघेरे यांना विजयी करा, असे आवाहन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) युवा सेनेचे प्रमुख आदित्य ठाकरे यांनी केले.**



मावळ लोकसभा मतदारसंघासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांचा उमेदवारी अर्ज आज, मंगळवारी दाखल करण्यात आला. त्यावेळी काढण्यात आलेल्या पदयात्रेत महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सभेला संबोधित केले. त्यामुळे आदित्य ठाकरे बोलत होते. मावळ लोकसभेत संजोग वाघेरेंना विजयी करण्याची जबाबदारी मतदारांनी घेतलेल्याचे सांगत आदित्य ठाकरे पुढे म्हणाले की, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष हा जनतेची आणि कार्यकर्त्यांची काळजी घेतली पाहिजे, हा विचार घेऊन पुढे जातो. देशात परिवर्तन होणार आहे. भाजपचे सरकार परत येणार नाही. अबकी बार, भाजपा तडीपार करण्याची गरज सर्वांच्या लक्षात आलेली आहे.

युवकांचे रोजगार हिरावले. गद्दारांच्या सरकार आल्यावर एकही नोकरीची संधी आलेली नाही. गुजरातला विरोध नाही, पण महाराष्ट्र, आसाम, केरळ, मणिपूर सर्वांना हक्काचे जे असेल ते मिळाले पाहिजे. ज्या राज्यात गुंड मंत्रालयात रील काढतात. तिथे कोणाला सुरक्षित वाटत नाही. बलात्कार करणाऱ्या प्रत्येकाला फाशी झाली पाहिजे, ही बाळासाहेब ठाकरे यांची शिकवण आपल्याला आहे. मात्र, भाजपकडून बलात्का-यांना वाचविण्याचे काम केले जाते. महिला वर्ग भाजपला मतदान करणार नाही. महागाईमुळे गरिबांना जगणे मुश्कील झाले आहे. शेतकरी, महिला, युवा, गरिब या वर्गाला देशोधडीला लावण्याचे काम केंद्र व राज्य सरकारने केले. कृषीमंत्र्याचे नाव देखील माहित नाही. पुढचे पाच वर्षे हे सरकार पडणार नाही. उद्धव ठाकरे साहेबांनी महाविकास आघाडीच्या सरकार असताना कर्जमाफी दिली.

#### पक्ष फोडला, चिन्ह चोरले, तरी सुज्ञ जनता ठाकरेंबरोबर

काँग्रेस नेते माणिकराव ठाकरे म्हणाले, पहिल्या फेरीत विदर्भाच्या पाच जागांमध्ये हवा महाविकास आघाडीच्या बाजुने आहे. पाचही जागा जिंकणार आहोत. देशात ज्या पद्धतीने राजकारण भाजपने केले. धर्माच्या, जातीच्या नावाने लोकांना फसवले जात आहे. देशात इंडिया आघाडीला सत्तेवर आणण्याचे जनतेने ठरवले आहे. सर्वांनी एकजूट दाखवली पाहिजे. उद्धव ठाकरे यांच्याबाबत पक्ष फोडला, चिन्ह चोरले हे भाजपने घडवून आणले. परंतु जनता सुज्ञ असून ते ठाकरेंबरोबर आहे. तेच निवडणुकीत त्यांना उत्तर देणार आहेत.

#### गद्दारी गाडण्यासाठी मावळमध्ये मशाल पेटवा – डॉ. अमोल कोल्हे

खासदार डॉ. अमोल कोल्हे म्हणाले, शिवसैनिक निखा-यासारखा असतो. तो पेटून उठला, तर तो विजत नाही. आदिलशाहीला न जुमानता वतनावर पाणी सोडून कान्होजीराजे जैधे स्वराज्यासोबत राहिले. म्हणून त्यांच्या निष्ठेचा इतिहास सांगितला जातो. हनुमानाने शेपटीची मशाल करून रावणाची लंका दहन करण्याचे काम केले. जो कोणी देशाला मातृभूमी मानतो. त्या सर्वांची ही निवडणूक आहे. या निवडणुकीत गद्दारांना धडा शिकवून गद्दारी गाडण्यासाठी मावळ लोकसभेत मशाल पेटवा, असं आवाहन त्यांनी केले

#### आपलं ठरलंय, संजोग वाघेरेंना खासदार करायचंय – रोहित पवार

आमदार रोहित पवार म्हणाले, मावळ लोकसभा मतदारसंघात परिवर्तन घडवून आणण्यासाठी आपण सर्व एकत्र आहोत. मावळच्या भूमीने कायम स्वाभिमान राखला. तोच या निवडणुकीत राखणार आहेत. गद्दारांना धडा शिकविण्यासाठी आणि भाजपला जागा दाखविणारी ही लढाई आहे. कोणी काही सोयीचे राजकारण केले, तरी आपण निष्ठा सोडणार नाही. भाजपने २०१४ नंतर कंपन्या आणल्या नाहीत. पण, हक्काचा उद्योग गुजरातमध्ये गेला. इथल्या खासदारांनी काय केले ? एकजुटीने आपलं ठरलंय, संजोग वाघेरे यांना खासदार करायचंय, असा नारा देत संजोग वाघेरेंना शहरातून तीन लाखांचे मताधिक्य द्या, असे आवाहन रोहित पवारांनी केले.

#### खोटं बोला, पण रडून बोला, अशी मिंधेंची अवस्था – आदित्य ठाकरे

**भाजपकडून दुसऱ्यावर चिखल फेकून त्यांना ऑफर दिली जाते. जॉइंट ऑर जेल, हे सर्वच ठिकाणी सुरू आहे. धमक्या देऊन सरकारे पाडली जातात. दहा वर्षापूर्वी दिलेल्या कोणत्याही आश्वासनावर भाजप आणि मिंधे बोलत नाहीत. सत्तामेव जयते, हाच मंत्र असलेल्या भाजपने मिंधेंना घटनाबाह्य मुख्यमंत्री म्हणून आपल्या डोक्यावर बसवलं. खोटं बोला, पण रडून बोला, अशी मिंधेंची अवस्था आहे. त्यांच्या खोटारडेपणा विरोधात ही लढाई आहे, असा हल्लाबोल आदित्य ठाकरे यांनी यावेळी केला.**

#### गर्दीवरूनच वाघेरेंचा विजय निश्चित – सचिन अहिर

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपनेते आमदार सचिन अहिर म्हणाले, मावळ लोकसभेचा संजोग वाघेरे पाटील यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आलेली गर्दी भाड्याची नाही. त्यांच्यावरील प्रेमापोटी आलेली आहे. लोकांनी ही निवडणूक हातामध्ये घेतलेली आहेत.

---

## प्राधिकरण येथील जलतरण तलाव नागरिकांसाठी खुला करा!

### मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांचा आंदोलनाचा इशारा

।पिंपरी।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

प्रभाग क्र १३, यमुनानगर, निगडी येथील कै. मीनाताई ठाकरे जलतरण तलाव आणि प्राधिकरण येथील छत्रपत्ती शिवाजी महाराज जलतरण तलाव नागरिकांसाठी तात्काळ खुला करण्यात यावा अशी मागणी मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे. लवकरात लवकर हे जलतरण तलाव खुले न झाल्यास मनसे स्टाईलने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील चिखले यांनी दिला आहे.



पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग क्र १३, यमुनानगर, निगडी येथील कै. मीनाताई ठाकरे जलतरण तलावाचे दुरुस्तीचे काम होऊन वर्षभर लोटले आहे. तरी देखील प्रशासनाकडून नागरिकांना वेठीस धरण्याचे काम चालू आहे. काम पूर्ण झाले असताना हा तलाव नागरिकांच्या वापरासाठी खुला करण्यात आलेला नाही. सध्या उन्हाळ्याचे प्रमाण खूप जास्त प्रमाणात वाढले असून नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात जलतरण तलाव चालू करण्याची मागणी होत आहे.

मागील वेळेस प्रशासनाने दि. ४/३/२०२४ रोजी दिलेल्या पत्रात म्हटले होते की, पुढील १५ दिवसात जलतरण तलाव चालू करण्यात येईल. परंतु तसे झालेले नाही, तरी वरील गोष्टीचा गांभीर्याने विचार करून नागरिकांच्या हितासाठी लवकरात लवकर कै. मीनाताई ठाकरे जलतरण तलाव वापरासाठी खुला करण्यात यावा. अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा चिखले यांनी दिला आहे.

#### जलतरण तलावाची पाहणी


**दरम्यान सचिन चिखले यांनीं महापालिका अतिरिक्त आयुक्त पंकज पाटील व रंगराव कराडे यांच्यासह जलतरण तलावाची पाहणी केली. पुढील ४ ते ५ दिवसात तलाव चालु करणार आहे असे आश्वासन त्यांनी सचिन चिखले यांना दिले आहे.**

# राजकारणात रंगांना एवढं महत्त्व का?




**पक्षीय राजकारण हे एखादं उत्पादन विकण्यासारखंच आहे. सगळे साबण जसे इथून तिथून सारखेच, पण प्रत्येक कंपनी वेगवेगळे दावे करते. कोणी म्हणतं आमचा साबण जंतूंचा ९९ टक्के नायनाट करेल, तर कोणी मृदु-मुलायम-उजळ त्वचेचं आश्वासन देतं. साबणांच्या आवरणांचे रंगही या दाव्यांना साजेसे असतात.**

राजकीय पक्षांचंही काहीसं तसंच आहे. प्रत्येक पक्ष आम्हीच भारी अशा बढाया मारतो. आपापल्या रंगाचे झेंडे, गमछे, टोप्या अशा प्रचारसाहित्याच्या आकर्षक पॅकेजिंगने मतदारांवर छाप पाडण्याचा प्रयत्न करतो. ग्राहक जाणून असतो की कोणताही साबण वापरला तरीही आपली नैसर्गिक त्वचा काही फारशी बदलणार नाही, म्हणून त्यातल्या त्यात कमी नुकसान करेल असा साबण तो खरेदी करतो. मतदारालाही पक्कं ठाऊक असतं, की कोणताही पक्ष सत्तेत आला तरी जगावेगळं काही करून दाखवणार नाही, पण दगडापेक्षा विट मऊ म्हणत तो त्यातल्या त्यात बरा वाटणाऱ्याला मत देतो. शेवटी साबणाची कंपनी असो वा राजकीय पक्ष दोघांचाही उद्देश एकच असतो. स्वतःचा नफा! आणि ग्राहक असोत वा मतदार, दोघेही हे जाणून असतात. त्यामुळे खरंतर दूरदर्शनचा लोगो भगवा होणं यात फार काही नवल नाही. मुद्दा आहे तो साधलेल्या मुहूर्ताचा. ऐन निवडणुकीच्या काळात,



आचारसंहिता लागू असताना, पहिल्या टप्प्याचं मतदान झालं असताना अचानक रंग बदलण्याची एवढी निकड का वाटली असावी? दूरदर्शनने स्पष्टीकरण दिलं की डीडी न्यूजचा पूर्ण चेहरा-मोहरा बदलण्यात येत आहे आणि लोगोमधला बदल हा त्याचाच भाग आहे, तो भगवा नसून केशरी आहे वगैरे वगैरे... पण विरोधकांच्या मते ही सारी सारवासारव आहे.

या रंगबदलावरच्या टीकेत सर्वात आघाडीवर आहे तृणमूल काँग्रेस- निवडणूक काळात सत्ताधारी पक्षाची ओळख असलेल्या भगव्या रंगात डीडी न्यूजचा लोगो सादर करण्यात आला आहे. निवडणूक आयोग हे कसे काय चालवून घेतो? हे आचारसंहितेचं उल्लंघन आहे. हा लोगो त्वरित रोखण्यात यावा, अशी मागणी ममता बॅनर्जी यांनी केली. त्यांच्याच पक्षाचे राज्यसभा खासदार आणि प्रसारभारतीचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी जवाहर सरकार यांनी आता प्रसारभारती प्रचारभारती झाली आहे, अशा शब्दांत या बदलाची संभावना केली. भाजप सत्तेत आल्यापासून भगवे राजकारण हा चर्चेचा मुद्दा झाला आहे. दूरदर्शनवर नेहमीच सरकारी वाहिनी म्हणून टीका होत आली आहे. भाजपच्या कार्यकाळात राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचं थेट प्रक्षेपण करण्यावरून आणि केरळ स्टोरी या चित्रपटाच्या प्रसारणावरून दूरदर्शनचं भगवेकरण होत असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. भारतीय क्रिकेट संघाच्या भगव्या जर्सीवरही कडाडून टीका झाली होती.

रंगांच्या राजकारणाचे अनेक किस्से आहेत आणि हे राजकारण सर्वाधिक ठळकपणे रंगतं, ते उत्तर प्रदेशात... २९ ऑक्टोबर २०२० ला समाजवादी पार्टीच्या ऑफिशियल ट्विटर हँडलवरून एक ट्विट करण्यात आलं होतं. त्यात हिरव्या आणि लाल रंगांत रंगविलेल्या स्वच्छतागृहांचं चित्र होतं आणि म्हटलं होतं, दूषित विचारांच्या सत्ताधाऱ्यांनी गोरखपूर रेल्वे रुग्णालयातल्या शौचालयाच्या भिंतींना समाजवादी पार्टीच्या झेंड्यातील रंग दिले आहेत. ही लोकशाहीला कलंकित करणारी लाजिरवाणी घटना आहे. एका मुख्य राजकीय पक्षाच्या झेंड्याचा हा घोर अपमान निंदनीय आहे. भिंतींचे रंग त्वरित बदलण्यात यावेत... ही केवळ एक झलक!

उत्तरप्रदेशातलं रंगांचं राजकारण गडद होऊ लागलं ते मायावतींच्या काळात. दलितांच्या चळवळीचं प्रतीक असलेला निळा रंग आणि हत्तीचं चित्र ही बहुजन समाज पार्टीची ओळख! या पक्षाच्या मिरवणुका आणि सभांमध्ये निळे झेंडे, गडद निळ्या रंगांचं व्यासपीठ याव्यतिरिक्त एक लक्षवेधक घटक असे तो म्हणजे निळ्या रंगात चेहऱ्यासह संपूर्ण शरीर रंगविलेले कार्यकर्ते. काहीवेळा या कार्यकर्त्यांच्या हातात निळ्या हत्तीच्या प्रतिमा किंवा प्रतिकृतीही असत. मायावती मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर लगेचच राज्यभरात अनेक ठिकाणी रस्त्यांच्या दुभाजकांपासून, सरकारी संपर्क क्रमांकांच्या डायऱ्यांपर्यंत सारं काही निळ्या रंगात रंगून गेलं. तोवर वाहतूक पोलिसांचा गणवेश संपूर्ण पांढरा होता, मायावतींच्या कार्यकाळात त्यात पांढरं शर्ट आणि निळी पँट असा रंगबदल केला गेला.

## संपादकीय »

### गुकेशची बुद्धिझेप!

***भारतीय बुद्धिबळपटूंना या स्पर्धेत फार संधी मिळणार नाही, असे भाकीत बहुतेक माजी बुद्धिबळपटू आणि विश्लेषकांनी व्यक्त केले होते.***


भारताचा विख्यात बुद्धिबळपटू, माजी जगज्जेता विश्वनाथन आनंद वयाच्या १७ व्या वर्षीपर्यंत ‘ग्रँडमास्टर’ बनला नव्हता. १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर आनंद ज्युनियर जगज्जेता बनला. गुकेश त्या वयाचा होईपर्यंत बहुधा बुद्धिबळातील सीनियर जगज्जेता बनलेला असेल. आनंदने बुद्धिबळात जे मिळवले, ते अतुलनीय खरेच. पण त्याची गादी चालवणारा भारतात कोणी तयार होईल का, या प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या फंदात आता भारतीय बुद्धिबळप्रेमी फारसे पडणार नाहीत. कारण गुकेशच्या रूपात त्या प्रश्नाचे खणखणीत उत्तर मिळाले आहे. १२व्या वर्षीच गुकेश ग्रँडमास्टर बनला. या खेळाच्या इतिहासातील सर्वात युवा ग्रँडमास्टर बनण्याचा त्याचा विक्रम अवघ्या १७ दिवसांनी हुकला! भारताच्या ताज्या दमाच्या युवा ग्रँडमास्टरांच्या गटामध्ये गुकेश सर्वात तरुण. सुरुवातीच्या वर्षांमध्ये त्याच्यापेक्षा आर. प्रज्ञानंद, निहाल सरीन, अर्जुन एरिगेसीसारख्या उदयोन्मुख बुद्धिबळपटूंनी अधिक चमक दाखवली होती.

चातुर्वण्र्य पद्धतीतील सर्वात खालच्या पायरीवर असलेल्या शूद्रांना अस्पृश्यतेची वागणूक दिली जात असे. त्यांचा स्पर्श झाला तरी अपवित्र घटना घडेल, अशी धारणा होती. शूद्रांना यामुळेच तर मंदिरात प्रवेश दिला जात नव्हता. अगदी काही भागांत तर शूद्र जातींनी उच्च जातींपासून किती अंतरावरून चाललं पाहिजे, याबाबतचे नियम होते.

# संविधानाचा परीसस्पर्श

तिसरी-चौथीत शिकणाऱ्या मुलांचा घोळका आपल्याला दिसतो. ती मुलं खेळताहेत. खोडया करताहेत. तेवढ्यात त्यांना सूचना दिली जाते: या इकडच्या घरात या. त्यातला एक मुलगा म्हणतो, “नाही, आम्ही येणार नाही.” का येणार नाही, अशी विचारणा केल्यावर मुलगा उत्तर देतो, “ते लीलाबेनचं घर आहे. लीलाबेन भंगी आहेत. आम्ही त्यांच्या घरात गेलो तर आम्हाला विटाळ होईल.” के स्टॅलिन दिग्दर्शित ‘इंडिया अनटच्ड’ या माहितीपटाची ही सुरुवात आहे. २००७ साली हा माहितीपट प्रसिद्ध झाला. भारतातील अस्पृश्यतेच्या प्रथेचं विदारक चित्र या माहितीपटातून समोर येतं.

चातुर्वण्र्य पद्धतीतील सर्वात खालच्या पायरीवर असलेल्या शूद्रांना अस्पृश्यतेची वागणूक दिली जात असे. त्यांचा स्पर्श झाला तरी अपवित्र घटना घडेल, अशी धारणा होती. शूद्रांना यामुळेच तर मंदिरात प्रवेश दिला जात नव्हता. अगदी काही भागांत तर शूद्र जातींनी उच्च



जातींपासून किती अंतरावरून चाललं पाहिजे, याबाबतचे नियम होते. शूद्राची सावलीही पडता कामा नये, असे र्निबंध होते. उच्चवर्णीयांच्या घरात शूद्रांना प्रवेश दिला जात नसे, दिलाच तर त्यांच्यासाठी वेगळा कप, बशी अशी भांडी असायची. अगदी उच्चवर्णीय व्यक्तीच्या घरासमोरून जाताना अनवाणी गेलं पाहिजे, अशा अनेक रूढी परंपरा अस्पृश्यतेच्या आधारावर सुरू होत्या. एकोणिसाव्या शतकात या कर्मठ परंपरेला मोठ्या प्रमाणात विरोध सुरू झाला. सामाजिक समतेसाठी लढणाऱ्या अनेकांनी या प्रथेचा त्याग केला. बडोद्याचे राजे महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी कायदे केले. अस्पृश्य मुलांसाठी शिष्यवृत्ती त्यांनी सुरू केली. जर कोणी अस्पृश्यतेचे पालन केले तर त्या व्यक्तिवर कारवाई होईल, असे फर्मान काढले. संस्कृत पाठशाळा सर्वांसाठी खुली केली. अस्पृश्यांना आरोग्याच्या सुविधा मोफत मिळतील, अशी व्यवस्था केली. १९१८ साली झालेल्या अस्पृश्यता निर्मूलन सभेचे अध्यक्षपद सयाजीराव गायकवाड यांनी भूषवले. त्याचप्रमाणे महर्षी वि. रा. शिंदे यांनी या अनुषंगाने केलेले कार्यही मौलिक आहे. शिंदे स्वत: शूद्रांच्या वस्तीत जाऊन राहिले आणि अस्पृश्यता निर्मूलनाकरता झटत राहिले. महात्मा गांधी यांनीही अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य प्राधान्याचे आहे, असे मानले. गांधी म्हणाले होते की, शूद्रांचे शुद्धीकरण करण्याची आवश्यकता नाही, उलट उच्चजातीयांचे मानवतेसाठी शुद्धीकरण करण्याची गरज आहे.

स्वाभाविकच संविधानसभेत अस्पृश्यता निर्मूलन हा महत्त्वाचा मुद्दा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर अस्पृश्यतेचा सामना

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अमरावतीमधील शाहांच्या सभेवरून राडा!

## सायन्स कोर मैदानावरील सभेवरून रंगला बच्चू कडू विरुद्ध राणा सामना

।अमरावती। महाईन्यूज।प्रतिनिधी।

**अमरावती लोकसभा मतदारसंघात उमेदवारी जाहीर होत असताना बच्चू कडू आणि महायुतीमधील संघर्ष विकोपाला गेला. भाजपाने नवनीत राणा यांना पक्षात घेऊन उमेदवारी दिल्यामुळे नाराज झालेल्या बच्चू कडू यांनीही प्रहार जनशक्तीतर्फे दिनेश बुब यांना मैदानात उतरविले. तर महाविकास आघाडीतर्फे बळवंत वानखेडे यांना उमेदवारी देण्यात आलेली आहे. भाजपाने अमरावतीमध्ये विजय मिळवण्यासाठी कंबर कसली असून अनेक दिग्गज नेत्यांच्या सभा येथे झालेल्या आहेत. आता मतदानाच्या अवघ्या दोन दिवस आधी म्हणजेच २४ एप्रिल रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचीही सभा होणार आहे. त्यावरून बच्चू कडू आणि रवी राणा आमनेसामने आलेले पाहायला मिळत आहे.**



अमरावती शहरातील सायन्स कोर मैदानात प्रहार जनशक्ती पक्षाच्या बच्चू कडू यांना २३ आणि २४ एप्रिलसाठी सभा घेण्यास निवडणूक आयोगाकडून परवानगी मिळाली होती. मात्र २४ एप्रिल रोजी भाजपाच्या उमेदवार नवनीत राणा यांच्या प्रचारासाठी अमित शाह याच मैदानावर प्रचार सभा घेणार असल्यामुळे बच्चू कडू यांना आज मैदानाचा ताबा घेण्यासापासून पोलिसांनी मज्जाव केला. आपल्याकडे रितसर परवानगी असूनही पोलीस आपली अडवणूक करत असल्याचा आरोप करून बच्चू कडू यांनी पोलिसांसमोर ठिय्या आंदोलन करत पोलीस भाजपाधार्जिण निर्णय घेत असल्याचा आरोप केला. बच्चू कडू यांच्या आक्रमक भूमिकेनंतर स्वाभिमानी युवा पक्षाचे नेते आणि नवनीत राणा यांचे पती रवी राणा यांनी टीका केली आहे.

महत्त्वाच्या नेत्यांच्या सभा होत असतील तर निवडणूक आयोगाकडून त्या त्या वेळी निर्णय घेतले जात असतात. उद्या अचलपूर येथे आमची सभा होती. मात्र तिथे राहुल गांधी येणार असल्यामुळे माझी सभा रद्द करण्यात आली. काल सांस्कृतिक भवन आमच्या नावाने घेण्यात आले होते. मात्र शरद पवार आणि उद्धव ठाकरे येणार असल्यामुळे ऐनवेळी आम्हाला दिलेली परवानगी रद्द करण्यात आली. मोठे नेते येणार असतील तर त्यांच्या सुरक्षेच्या कारणास्तव काही बदल केले जात असतात. प्रशासन त्याचा निर्णय घेत असते. बच्चू कडू यांनी परवानगी मागण्याआधीच आम्ही २१ ते २४ एप्रिल या तारखांमध्ये आमची सभा होऊ शकते, असे निवडणूक आयोगाला कळविले असल्याचे आमदार रवी राणा म्हणाले.

### काय म्हणाले रवी राणा?

» रवी राणा म्हणाले, “बच्चू कडू हे नेहमीप्रमाणे स्वस्तातली प्रसिद्धी मिळवण्यासाठी नौटंकी करत आहेत. या नौटंकीबाजाला महाराष्ट्राची जनता चांगली ओळखून आहे. देशाचे गृहमंत्री अमित शाह हे अमरावतीमध्ये येत आहेत. अमित शाह यांनी अमरावतीमधील उमेश कोल्हे हत्याकांड उघड करण्यासाठी प्रयत्न केले होते. तर दुसऱ्या बाजूला तत्कालीन मंत्री बच्चू कडू आणि यशोमती ठाकूर यांनी हे हत्याकांड दाबण्याचा प्रयत्न केला होता. उमेश कोल्हे यांच्या प्रकरणाला घरोफोडीच्या प्रकरणात बदलण्यात आले होते. मात्र अमित शाह यांच्या हस्तक्षेपामुळे या प्रकरणात न्याय मिळाला. त्या अमित शाह यांना बच्चू कडू विरोध करत आहेत, हे दुर्दैवी आहे.”

# दुसऱ्याने मंजूर केलेल्या कामाचे नारळ फोडण्याचे काम भाजप खासदारांनी केले

## अपक्ष उमेदवार विशाल पाटील यांनी केला प्रचाराचा शुभारंभ

।सांगली।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या दहा वर्षात केवळ दुसरयाने मंजूर केलेल्या कामांचे नारळ फोडण्याचे काम खासदार संजयकाका पाटील यांनी केले असल्याची टीका निवडणूक प्रचाराच्या शुभारंभालाच अपक्ष उमेदवार विशाल पाटील यांनी केली. लोकसभा निवडणुकीमध्ये अपक्ष म्हणून रिंगणात उतरल्यानंतर पाटील यांनी औदुंबर येथे मंगळवारी प्रचार शुभारंभ केला.**



यावेळी ते म्हणाले, प्रचारासाठी केवळ दहा ते बारा दिवसांचा कालावधी मिळाला असला तरी माझी उमेदवारी जनतेची आहे. हा लढा सांगलीच्या अस्तित्वाचा आणि अस्मितेचा आहे. गेल्या काही दिवसापासून वैयक्तिक संपर्कात आहे. जनतेनेच ही निवडणूक हाती घेतली असल्याने मला फारशी चिंता उरलेली नाही. मला मिळालेले लिफाफा हे चिन्ह मतदारापर्यंत पोहचविण्यात कोणतीच अडचण वाटत नसून आहेराच्या स्वरूपात मला जनता मतदान करेल असा विश्वास वाटतो.

प्रचाराचा शुभारंभ झाल्यानंतर पहिल्याच दिवशी जत तालुक्यात त्यांनी प्रचार दौरा केला. जत तालुका सर्व विधानसभा मतदार संघांमध्ये मोठा आहे. विद्यमान खासदारांनी या तालुक्याकडे लक्षच दिलेले नाही. मंजूर कामाचे नारळ फोडण्याचे काम त्यांनी केले असल्याचा आरोप जत तालुक्यातील विविध ठिकाणी भेटी प्रसंगी त्यांनी केला. जत तालुक्यात मुचंडी जिल्हा परिषद गटाअंतर्गत रावळगुंडवाडी येथे, दरीबडची पंचायत समिती गणांअंतर्गत दरीबडची, उमदी, जाडर बोबलाद, माडग्याळ आदी ठिकाणी प्रचार सभा घेण्यात आल्या. कोत्याव बोंबलाद व जल्याळ बुद्रुक येथील यात्रांनाही त्यांनी भेटी दिल्या.

### मिरजेत जयश्री पाटील प्रचारात

**»मिरज शहरात स्व. मदन पाटील यांच्या पत्नी जयश्री पाटील यांनी प्रचार दौरा केला. यावेळी माजी महापौर मैनुद्दीन बागवान, काँग्रेसचे शहराध्यक्ष माजी नगरसेवक संजय मेंढे, माजी उपमहापौर आनंदा देवमाने, शिवाजी दुर्वे, निंरजन आवटी, संदीप आवटी आदी सहभागी झाले होते.**

# नरेंद्र मोदी यांचा चेहरा देशासाठी घातक; माणिकराव ठाकरे यांची सडकून टीका

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



‘काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर मुस्लीम लीगची छाप आहे किंवा काँग्रेस सत्तेत आल्यास महिलांचे मंगळसूत्र हिसकावेल, अशी बेताल वक्तव्ये पंतप्रधानपदावर बसलेल्या व्यक्तीला शोभत नाहीत. तोल सुटल्याने मोदींना कसलेही तारतम्य राहिलेले नाही. त्यांच्या पायाखालची वाळू सरकू लागली आहे. त्यामुळे मोदींचा चेहरा देशासाठी हानीकारक आहे,’ अशी टीका काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे यांनी मंगळवारी केली. ‘मोदींनी निवडणूक आयोगाचा गळा दाबला आहे. जाती, धर्मांत तेढ निर्माण करून मत मिळवायचा मोदींचा प्रयत्न आहे. काँग्रेसचा जाहीरनामा सर्वसामान्य भारतीयांना न्याय देण्यासाठी आहे. ३० लाख नोकऱ्यांची हमी ही दोन कोटी तरुणांना नोकरी यासारखी फसवी घोषणा नाही.

काही राज्यांत नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने दिलेली गॅरंटी पूर्ण केली आहे. मोदींना हाच शब्द उचलला आहे,’ असे टीकास्त्र ठाकरे यांनी सोडले.

### ‘शिंदे, अजित पवार यांची उंची घटली’

» ‘राज्यातील सर्व जागा ठरवण्याचा अधिकार उपमुख्यमंत्री अजित पवार यांना होता. काँग्रेसकडून मी आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून अजित पवार निर्णय घेत होतो. आता अजित पवार यांना केवळ चार जागांचाच अधिकार असून, त्यातील दोन जागांवर उमेदवार आयात करावे लागले आहेत. सत्ताधारी फासावर चढवणार होते म्हणून वडीलधाऱ्या व्यक्तीच्या विरोधात भूमिका घेतली का,’ असा सवाल माणिकराव ठाकरे यांनी अजित पवारांना केला. ‘मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे केवळ मोहरे असून, त्यांची स्वपक्षातील आणि राज्यातील सन्मान कमी झाला आहे,’ असा टोलाही ठाकरे यांनी लगावला.

# दलित समाजात अस्वस्थता!

## भाजपच्या 'चार सौ पार'च्या घोषणेने संविधान बदलाची चर्चा

। नागपूर ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीत भाजपने 'चार सौ पार'चा नारा दिल्याने पुन्हा सत्तेत आल्यावर संविधान बदलले जाईल या चर्चेने दलित समाजात अस्वस्थता पसरली आहे. भविष्यात संविधान बदलण्याच्या दृष्टीने प्रयत्न होतील, अशी भीती आंबेडकरी चळवळीतील साहित्यिक, कार्यकर्ते व्यक्त करत आहेत. यासंदर्भात राज्यातील लहान-मोठ्या आंबेडकरी संघटनांच्या ठिकठिकाणी होत असलेल्या बैठकांमधून चिंतेचा सूर उमटू लागला आहे.**




भाजपला चारशेपेक्षा अधिक जागा का हव्या आहेत, कारण त्याशिवाय त्यांना संविधान बदलता येणार नाही. संविधान बदलण्यासाठीच त्यांनी चारशे पारची घोषणा दिली आहे, असा मतप्रवाह आंबेडकर चळवळीतील कार्यकर्त्यांमध्ये दृढ होऊ लागला आहे. त्याचवेळी स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या तीन प्रमुख तत्त्वांवर आधारित भारताचे संविधान बदलणे अशक्य आहे, असा विश्वासही या वर्गात आहे. मात्र, नरेंद्र मोदींच्या दहा वर्षांच्या राजवटीत शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक पातळीवर घेण्यात आलेले निर्णय लोकशाहीसाठी पोषक नसल्याची टीका होत असल्याने मोदींचा 'चार सौ पार' हा नारा संविधानविरोधी मानला जात आहे. त्यामुळे दलित, आंबेडकरी समाज निवडणुकीत काय भूमिका घेतो, यावर समाजमाध्यमांतही उघड चर्चा सुरू आहे. विदर्भात पहिल्या टप्प्यात झालेल्या पाच मतदारसंघांमधील मतदानात त्याचे पडसाद उमटल्याची चर्चा आहे. नागपूरमध्ये दलित समाजाचे लक्षणीय मतदार असलेल्या भागांमध्ये अतिउत्साहात झालेल्या मतदानाकडे लक्ष वेधण्यात येत आहे.

हेही वाचा >>>खारफुटीचे नव्याने सर्वेक्षण; महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर सर्वेक्षण करणार

या संदर्भात दलित समाजातील अभ्यासक, साहित्यिक, कार्यकर्त्यांच्या प्रतिक्रिया बोलक्या आहेत. "केंद्रात भाजप पुन्हा सत्तेवर आल्यास पुढच्या निवडणुकीत ते थेट संविधान बदलण्यासाठीच मतदान करण्याचे आवाहन करतील," असा थेट आरोप दलित पँथर चळवळीतील आघाडीचे नेते, लेखक ज. वि. पवार यांनी केला. भाजपची भूमिका संविधानविरोधी असल्याची भावना आंबेडकरवादी कार्यकर्त्यांमध्ये असून त्याचे पडसाद निवडणुकीत उमटतील, अशी शक्यता महाराष्ट्र सेक्युलर मूव्हमेंटचे कार्याध्यक्ष भरत शेळके यांनी व्यक्त केली तर, नागपूर येथील आंबेडकरी विचारवंत डॉ. धनराज डहाट म्हणाले की, विद्यमान राजकीय परिस्थिती लक्षात घेता मोदींच्या 'चार सौ पार'च्या घोषणेकडे फक्त राजकीय अंगाने पाहता येणार नाही.

> **मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारची गेल्या दहा वर्षांची वाटचाल पाहता आंबेडकरी, दलित समाजाच्या मनात शंका आहे. मोदींनी दिलेला 'चारसो पार'चा नारा संविधान, लोकशाहीविरोधी असल्याचे मानून त्या विरोधात दलित, आंबेडकरी समाजात एकजूट पाहायला मिळते. समाजमाध्यमांवरील प्रतिक्रिया याचेच द्योतक आहे. -ॲड. मिलिंद पखाले, सामाजिक**

> **चारशे पारचा नारा आणि त्यामागचा त्यांचा संविधान बदलाचा हेतू लपून राहिलेला नाही. त्याचा फार मोठा परिणाम आंबेडकरी चळवळीवर होत आहे. महाराष्ट्रात तरी आंबेडकरी चळवळीमध्ये संविधान संरक्षणाचा मुद्दा कळीचा बनला आहे. -अर्जुन डांगळे, ज्येष्ठ साहित्यिक**

> **संविधान बदलणे शक्य नाही, पण संविधानाप्रमाणे निर्णय न घेणे यामुळेसुद्धा संविधान बदलाच्या शंकेला बळ मिळते. यातून भीती निर्माण होते. यामुळे दलित समाजात रोष निर्माण होणे स्वाभाविक आहे. - डॉ. धनराज डहाट, आंबेडकरी विचारवंत, नागपूर.**

> **मोदी पुन्हा सत्तेवर आले तर लगेच ते संविधान बदलणार नाहीत. परंतु काही काळानंतर ते संविधानाचे फक्त मुखपृष्ठ ठेवतील आणि आतील अनुच्छेद निष्प्रभ करतील. आडमार्गाने ते संविधान नाकारतील. - ज. वि. पवार, दलित पँथर चळवळीतील आघाडीचे नेते**

# धर्माच्या आधारावर आरक्षणाचा प्रयत्न!

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा काँग्रेसवर आरोप

। जयपूर ।

महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काँग्रेसने धर्माच्या आधारावर मुस्लिमांना आरक्षण देण्याचा प्रयत्न केला असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. तसेच त्या पक्षाने काही ठरावीक लोकांना वाटण्यासाठी जनतेची संपत्ती ताब्यात घेण्याचे व्यापक षड्यंत्र रचल्याचा पुनरुच्चार केला. टोंक येथील सभेत त्यांनी काँग्रेसवर चौफेर टीका केली.**



काँग्रेसच्या राजवटीत एखाद्याला आपल्या धर्माचे पालन करणेही कठीण होते. त्यांच्या सरकारमध्ये हनुमान चालीसा पठणही गुन्हा ठरला असा आरोप पंतप्रधानांनी केला. मंगळवारी हनुमान जयंती असल्याचा संदर्भ येथे होता. काँग्रेसने २००४ मध्ये केंद्रात सरकार स्थापन केल्यानंतर आंध्र प्रदेशात अनुसूचित जाती-जमातींचे आरक्षण कमी करून ते मुस्लिमांना दिले. मात्र आमच्या सरकारमध्ये दलित-आदिवासींचे आरक्षण बंद होणार नाही किंवा धर्माच्या आधारावर भेद केला जाणार नाही ही मोदींची हमी असल्याचे स्पष्ट केले. संपत्तीच्या फेरवाटपाचा मुद्दा पंतप्रधानांनी पुन्हा उपस्थित करत, काँग्रेस संपत्ती हिरावून काही ठरावीक लोकांना देईल असा आरोप केला. काँग्रेसने २००४ केंद्रात सरकार स्थापन झाल्यावर आंध्रमध्ये अनुसूचित जाती-जमातींचे आरक्षण कमी करून मुस्लिमांना दिले. देशभर त्यांना हे प्रारूप लागू करायचे होते. २००४ ते २०१० या काळात चार वेळा त्यांनी आंध्र प्रदेशात मुस्लिमांना आरक्षण देण्याचा प्रयत्न केला. मात्र कायदेशीर अडचणींमुळे त्यांना हे लागू करता आले नाही. २०११ मध्ये काँग्रेसने हे प्रारूप देशभर लागू करण्याचा प्रयत्न केला. अनुसूचित जाती-जमाती तसेच इतर मागासवर्गीयांचे आरक्षण मतपेढीच्या राजकारणासाठी इतरांना देऊ केले. त्या वेळी घटनेची तसेच बाबासाहेब आंबेडकरांची त्यांना चिंता नव्हती अशी टीका पंतप्रधानांनी केली. कर्नाटकमध्ये जेव्हा भाजप सरकार आले त्या वेळी पहिल्यांदा आम्ही मुस्लीम आरक्षण रद्द केले.

# केरळमध्ये तिरंगी लढतीत भाजप पाच पेक्षा जास्त जागा जिंकणार : जावडेकर

। नवी दिल्ली ।

महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये केरळच्या २० जागांसाठी २६ एप्रिलला मतदान होणार आहे. इथे भाजपला एकही जागा जिंकता आलेली नाही. या वेळी मात्र केंद्रातील सत्ताधारी पक्ष इथे खाते उघडेल अशी आशा भाजपचे केरळप्रभारी प्रकाश जावडेकर यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना व्यक्त केली.**



केरळमधून भाजपचा एकही खासदार निवडून आला नाही म्हणून केंद्राने राज्याचा विकास थांबवला नाही. काँग्रेसच्या १० वर्षांच्या काळात केरळला ४६ हजार कोटींचे अनुदान दिले गेले, मोदींच्या १० वर्षांत १.५ लाख कोटी म्हणजे तिप्पट अनुदान मिळाले. ५० लाख मल्याळी परदेशात काम करतात. संकटांमध्ये युक्रेन, येमेन, आखाती देश, सुदानमधून बहुसंख्य मल्याळी लोकांना सुखरूप आणले गेले. आखाती देशांतील तुरुंगात अडकलेल्या ५६० मल्याळींना सोडवले गेले. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाची पत वाढल्यामुळे हे शक्य झाले. मल्याळी जनतेमध्ये मोदी सरकारवरील विश्वास वाढू लागला आहे, असेही प्रकाश जावडेकर म्हणाले.

२०१९ मध्ये केरळमधील बहुसंख्य मतदारांना राहुल गांधी पंतप्रधान होईल असे वाटले होते. तेव्हाही मोदीच पंतप्रधान झाले, २०२४मध्ये तर राहुल गांधींचे नावही कोणी घेत नाही. केरळचा विकास मोदीच करणार असतील तर विकास करणाऱ्या पक्षाला लोक मते देतील. दिल्लीत आंदोलने करणारे, संसदेत सभात्याग करणारे, फक्त प्रश्न मांडणारे खासदार हवेत की, प्रश्न सोडवू शकणारे लोकप्रतिनिधी हवेत हा विचार केरळचे मतदार या वेळी करतील.

विकास हा एकमेव मुद्दा आहे. मोदींच्या १० वर्षांत लोककल्याणाच्या योजना कोणत्याही भेदभावाविना राबवल्या गेल्या. केरळची लोकसंख्या ३.५ कोटी आहे, त्यातील १.५ कोटींना मोफत धान्य दिले जाते. तिरुवनंतपुरम-कासारगौड हा ३५० किमीचा सहा पदरी रस्ता ६० टक्के पूर्ण झाला. याच दोन शहरांना जोडणाऱ्या २ वंदे भारत रेल्वेगाड्या तुडुंब भरलेल्या असतात. 'माकप' आघाडी सरकारच्या 'के-रेल्वे' प्रकल्पावर फक्त महाभारत घडले, बाकी काहीच झाले नाही.

# ओटीटीवर अमृता खानविलकरचा धमाका!



मुंबई: डिझ्नी प्लस हॉटस्टारवरील वेब सीरिज 'लुटेरे'मधून अभिनेत्री अमृता खानविलकरच्या २०२४ या वर्षाची खास सुरुवात झाली. आता अभिनेत्री पुन्हा एकदा बॉलिवुडमधल्या काही खास कलाकारांच्या सोबतीने दिसणार आहे. २०२४ मधील अमृताचा हा दुसरा हिंदी प्रोजेक्ट असून ती आता यावेळी ॲमेझॉन मिनी टीव्ही वरच्या 'चाचा विधायक है हमारे ३' मध्ये झळकणार आहे. 'लुटेरे'मध्ये अभिनेत्रीने 'अविका' ही भुनिक साकारली आहे. आता ती 'चाचा विधायक है हमारे ३'मध्ये 'सुरेखा जी' ही भूमिका साकारणार आहे. अमृताने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत ही खास बातमी तिच्या चाहत्यांना दिली. या शोमध्ये ती लोकप्रिय कॉमेडियन झाकीर खान सोबत दिसणार आहे. अमृताने एक खास पोस्ट लिहिली आणि त्याला कॅप्शन देखील तितकच खास दिलं आहे. अभिनेत्रीने ही भूमिका करण्यासाठी खूप उत्सुक असल्याचे पोस्टमधून म्हटले. तिने असे लिहिले आहे की, 'मार्केट मध्ये विधायकजी यांना टक्कर देण्यासाठी कोणी तरी येतंय अशी बातमी आहे? खबर पक्की आहे! मी चाचा विधायक है हमारे ३ मध्ये येते आहे आणि ट्रेलरही आला आहे'. पहिले दोन हिट झालेले सीझन पाहता 'चाचा विधायक है हमारे ३' हा वेब शो नक्कीच भन्नाट असणार यात शंका नाही. याविषयी अमृता म्हणाली की,'लुटेरेनंतर अजून एक बॉलिवुड प्रोजेक्ट करताना खूप आनंद होतोय. ॲमेझॉन सारख्या बड्या ओटीटी प्लॅटफॉर्म वर आमची वेब सीरिज येते याहून मोठी गोष्ट काय असणार! विधायक जी यांना टक्कर देणारी सुरेखा नक्की काय भूमिका बजावणार, याची मला जेवढी उत्सुकता आहे तेवढीच प्रेक्षकांना सुद्धा याची उत्सुकता आहे. कायम वैविध्यपूर्ण भूमिका साकारत राहून प्रेक्षकांचं मनोरंजन करत राहण्यासाठी अजून काम करण्याची प्रेरणा यातून मिळते.

# संजय मोने-सुकन्या मोने का करत नाहीत एकत्र काम?



सिनेसृष्टीतील आदर्श व लोकप्रिय जोडी म्हणजे संजय मोने आणि सुकन्या मोने-कुलकर्णी. गेली कित्येक वर्ष हे दोघं विविधांगी भूमिका साकारून प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहेत. नाटक, मालिका, चित्रपट या तिन्ही माध्यमांमध्ये काम करून दोघांनी प्रेक्षकांची मनं जिंकून कायमच स्थान निर्माण केलं आहे. अशी लोकप्रिय जोडी गेली २२-२३ वर्ष एकत्र काम करत नाहीत. यामागच्या कारणाचा खुलासा अभिनेते संजय मोने यांनी केला आहे.

'तारांगण' एंटरटेनमेंट युट्यूब चॅनलशी संवाद साधताना संजय मोने यांनी पत्नीबरोबर एकत्र काम न करण्यामागचं कारण सांगितलं. ते म्हणाले, "माझ्या मुलीला जास्त वेळ देता यावा म्हणून लग्नानंतर आम्ही ठरवलं की, मुलीच्या जन्मानंतर २२-२३ वर्ष कधीच एकत्र काम करायचं नाही. त्यामुळे आम्ही कधीही एकत्र काम करत नाही. कारण दोघेही एका कामासाठी गेलो तर मुलीकडे लक्ष कोण देणार? मुलीना आपली १६-१७ वर्षांची होईपर्यंत गरज असते. पुढे तिला गरज लागत नाही."

दरम्यान, लग्नानंतर अपघातामुळे सुकन्या अंथरुणाला खिळल्या होत्या. डॉक्टरांनी सुकन्या मोनेंना मूल होऊ न देण्याचा सल्ला दिला होता. पण सुकन्या मोने आपल्या निर्णयावर ठाम होत्या. संजय मोने आणि सासूबाईंनी त्यांच्या मुलं होण्याच्या निर्णयाला विरोध केला. मात्र, सुकन्या हट्टाला पेटल्या होत्या आणि मूल होऊ देण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्यांच्या मुलीचा जन्म झाला. ज्युलिया असं त्यांच्या मुलीचं नाव आहे.

ज्युलिया वन्यप्राणी जीवशास्त्र (वाइल्डलाइफ बायोलॉजी) या विषयात शिक्षण घेत आहे. 'मास्टर इन ॲनिमल सायन्स ॲंड मेजर इन वाइल्डलाइफ बायोलॉजी' असं तिच्या संपूर्ण पदवीचं नाव आहे. ज्युलियाला बालपणापासून जंगल सफारी व प्राण्यांविषयी फार आवड आहे. त्यामुळे तिनं भविष्यात प्राणीशास्त्रात करिअर करण्याचा निर्णय घेतला.

# डॉन ३ मध्ये दिसणार जान्हवी

फरहान अख्तरच्या डॉन ३ ची घोषणा झाल्यापासून, त्याचे अपडेट्स जाणून घेण्यासाठी चाहते सतत उत्सुक असतात.यावेळी डॉन ३ चर्चेत आहे कारण शाहरुख खान मुख्य भूमिकेत नसेल.निर्मात्यांनी शाहरुख खानच्या जागी रणवीर सिंगला फायनल केले आहे. कियारा अडवाणी रणवीर सिंगसोबत रोमान्स करणार आहे. आता डॉन ३ बाबत कॉरिडॉरमध्ये नवी चर्चा सुरू झाली आहे.कियारा अडवाणी रणवीर सिंगसोबत रोमान्स करणार आहे. आता डॉन ३ बाबत कॉरिडॉरमध्ये नवी चर्चा सुरू झाली आहे. चाहत्यांनी शाहरुख खानला डॉनमध्ये पाहिलं. करीना कपूरनेही तिच्या आयटम नंबरने लोकांचे लक्ष वेधून घेतले. आता या भूमिकेसाठी जान्हवी कपूरला डॉन ३ मध्ये आणले जाऊ शकते.जान्हवी कपूर एक उत्तम अभिनेत्री आहे आणि डान्सच्या बाबतीतही तिची बरोबरी नाही.मात्र, आत्तापर्यंत डॉन ३च्या निर्मात्यांनी आणि स्वतः जान्हवी कपूरने या वृत्ताला दुजोरा दिलेला नाही.तर डॉन ३ बद्दल बोलायचे झाले तर रणवीर सिंग आणि कियारा अडवाणी मुख्य भूमिकेत दिसणार आहेत.फरहान अख्तरच्या डॉन ३ ची घोषणा झाल्यापासून, त्याचे अपडेट्स जाणून घेण्यासाठी चाहते सतत उत्सुक असतात.यावेळी डॉन ३ चर्चेत आहे कारण शाहरुख खान मुख्य भूमिकेत नसेल.



# आलियाला आवडायचा बंगाली पदार्थ

आलिया भट्ट आणि रणबीर कपूर यांनी अनेक वर्षे एकमेकांना डेट केल्यावर १४ एप्रिल २०२२ मध्ये लग्नगाठ बांधली. लग्नानंतर अभिनेत्रीने काही दिवसांतच गरोदर असल्याची बातमी सोशल मीडियावर शेअर केली होती. पुढे, ६ नोव्हेंबर २०२२ रोजी आलियाने राहाला जन्म दिला. सध्या रणबीर-आलियाची लाडकी लेक राहा सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाली आहे.गेल्यावर्षी ख्रिसमिसच्या निमित्ताने रणबीर-आलियाने राहाला माध्यमांसमोर आणलं. आता राहा दीड वर्षांची झाली आहे. सुद्धा सर्वत्र आलियाच्या लेकीची चर्चा रंगली होती. परंतु, तुम्हाला माहितीये का, लाडक्या लेकीच्या जन्मावेळी अभिनेत्रीला एक खास बंगाली पदार्थ खायची सारखी इच्छा व्हायची. आलियाच्या आहारतज्ज्ञांनी नुकत्याच एका पॉडकास्टमध्ये याबाबत

# ट्विंकल खन्नाने अंडरवर्ल्ड डॉनच्या पार्टीत केला होता डान्स?

ट्विंकल खन्नाने 'टाइम्स ऑफ इंडिया'साठी लिहिलेल्या कॉलममध्ये याबाबत तिची प्रतिक्रिया लिहिली आहे."मी एका टीव्ही न्यूज चॅनलवर माझ्या नावाचं टिकर पाहिलंय, ज्यात लिहिलं होतं की मी दाऊदसाठी डान्स केला होता. अनेक गाण्यांवर मी वेड्यासारखे नाचले होते. पण खरं सांगायचं झाल्यास माझ्या मुलांनाही असं वाटतं की माझा डान्स पाहणं डब्ल्यूडब्ल्यूएफचा सामना पाहण्यापेक्षा कमी नाही. त्यामुळे दाऊदने माझ्यापेक्षा



चांगल्या डान्सर निवडल्या असतील, हे वृत्तवाहिन्यांना कळायला हवं होतं, पण हे फेक न्यूजचं जग आहे."

ट्विंकल खन्नाने पुढे लिहिलं, "आपण फेरफार केलेल्या अनेक खोट्या बातम्या पाहिल्या आहेत. ज्यामध्ये कुस्तीपटूंच्या आंदोलनादरम्यान एक कुस्तीपटू हसतानाचा फोटो मॉर्फ करून व्हायरल करण्यात आला होता. अगदी त्या फोटोपासून ते करोना व्हायरसपर्यंत असंख्य फेक न्यूज आपण पाहिल्या आहेत." यापूर्वी अक्षय कुमारने आपल्या एका मुलाखतीत दाऊद इब्राहिमच्या पार्ट्यांमध्ये ट्विंकलने हजेरी लावल्याच्या बातम्या या फक्त अफवा असल्याचं म्हटलं होतं. २०१० मध्ये त्याने यावर प्रतिक्रिया दिली होती. "मला माहित नाही की अशा बातम्या कुठून येतात. या बातम्यांमध्ये तथ्य असते तर माझ्या घरावर आतापर्यंत छापेमारी झाली असती. ही बातमी समोर आल्यानंतर एकही पोलीस हवालदार माझ्या घरी आला नाही. पण या बातमीमुळे मला त्रास झाला," असं अक्षय म्हणाला.

# एकच वादा ऋतुराज दादा..!

## शिवमसह गोलंदाजांची धुलाई करत 200 धावांचा पल्ला केला पार

चेन्नई । वृत्तसंस्था

**ऋतुराजचेच राज्य CSK VS LSG या सामन्यात पाहायला मिळाले. ऋतुराजने धडाकेबाज फटकेबाजी करत दमदार शतक झळकावले. ऋतुराजच्या शतकाच्या जोरावर चेन्नईच्या संघाने विजयाचा पाया रचल्याचे म्हटले जात आहे. कारण ऋतुराजच्या दमदार शतकाच्या जोरावर चेन्नईच्या संघाने २१० धावांचा डोंगर उभारला आहे. ऋतुराजने यावेळी ६० चेंडूंत १२ चौकार आणि आठ षटकारांच्या जोरावर नाबाद १०८ धावांची खेळी साकारली. ऋतुराजला यावेळी शिवमने चांगली साथ दिली. शिवमने यावेळी २७ चेंडूंत ३ चौकार आणि सात षटकारांच्या जोरावर ६६ धावा फटकावल्या. महेंद्रसिंग धोनीने एकच चेंडू खेळत चौकार वसूल केला आणि चाहत्यांची मनं जिंकली.**



चेन्नईच्या संघाला अजिंक्य रहाणेच्या रुपात पहिलाच धक्का बसला. अजिंक्यला यावेळी एकच धाव करता आली. पण या धक्क्यातून संघाला बाहेर काढले ते ऋतुराजने. ऋतुराजलाही यावेळी ४ धावांवर असताना जीवदान मिळाले आणि त्याचा चांगलाच फायदा त्याने घेतला. जीवदान मिळालेल्या दुसऱ्याच षटकात त्याने दमदार फटकेबाजी करायला सुरुवात केली. पण यावेळी संघात स्थान दिलेल्या डॅरिल मिचेलला ऋतुराजला चांगली साथ देता आला नाही. सहाव्या षटकात मिचेल हा ११ धावांवर बाद झाला. मिचेलनंतर रवींद्र जडेजा फलंदाजीला आला आणि तो १७ धावांवर बाद झाला. ऋतुराज ही सर्व पडझड पाहत होता. पण तो थांबला नाही. कारण ऋतुराजने एका बाजूने लखनौच्या संघावर हल्लाबोल सुरुच ठेवला होता. एका बाजूने दमदार फलंदाजी करत ऋतुराजने अर्धशतक पूर्ण केले आणि तो शतकाच्या दिशेने निघाला.

ऋतुराजला यावेळी चांगली साथ देत होता तो शिवम दुबे. ऋतुराज आणि शिवम यांनी चौथ्या विकेटसाठी दमदार भागीदारी रचली. खासकरून १६ षटकात शिवमने यश ठाकूरला तीन षटकार मारत आपले इरादे स्पष्ट करून टाकले. १५ षटकांनंतर शिवम चांगलाच आक्रमक दिसत होता आणि ऋतुराज हा नव्वदीमध्ये दाखल झाला होता. ऋतुराजने यावेळी चौकारासह आपले शतक ५४ चेंडूंत पूर्ण केले. ऋतुराजच्या शतकानंतर शिवमचे अर्धशतकही पाहायला मिळाले. शिवमने यावेळी फक्त २१ चेंडूंत आपले अर्धशतक साकारले. अखेरच्या चार षटकांत तर ऋतुराज आणि शिवम यांनी तुफानी फटकेबाजी केली.

### तर पहिल्या चेंडूवर आऊट झाला असता

ऋतुराज गायकवाडने लखनौच्या सामन्यात दमदार शतक झळकावले. ऋतुराजच्या शतकाच्या जोरावरच चेन्नईला २१० धावा करता आल्या. पण ऋतुराजचे शतक सोडा एकही धाव होऊ शकली नसती. कारण ऋतुराज पहिल्याच चेंडूवर बाद झाला असता. पण त्यावेळी नेमकं काय घडलं ते आता समोर आले आहे. चेन्नईचा संघ फलंदाजीला उतरला. ऋतुराज आणि अजिंक्य रहाणे ही मराठमोळी जोडी मैदानात उतरली होती. यावेळी लखनौच्या संघाकडून मॅट हेन्री हा गोलंदाजीसाठी सज्ज होत होता. अजिंक्य रहाणे यावेळी स्ट्राइकवर होता, तर ऋतुराज नॉन स्ट्राइकवर होता. यावेळी मॅटने अजिंक्यच्या छातीच्या दिशेने चेंडू टाकला. पहिलाच चेंडू असल्याने अजिंक्यने मोठा फटका खेळला नाही आणि तो चेंडू त्याने सौम्यपणे टटावला.

या चेंडूवर धाव येईन, असे कोणालाही वाटत नव्हते. कारण हा चेंडू स्टम्प जवळच होता आणि गोलंदाज मॅटही त्या चेंडूकडे धावत येत होता. पण यावेळी ऋतुराज हा धाव घेण्यासाठी आग्रही असल्याचे पाहायला मिळाले. ऋतुराजने अजिंक्यला धाव घेण्यासाठी कॉल दिला. त्यावेळी अजिंक्यलाही ही धाव होईल, असे वाटत नव्हते. कारण त्याच्या चेहऱ्यावरचे भाव ही गोष्ट स्पष्टपणे सांगत होते. पण ऋतुराज काही मागे हटला नाही. त्याने धाव घेण्यासाठी आग्रही भूमिका कायम ठेवली. त्यामुळे अजिंक्यही क्रीझ सोडून पळाला. हे सर्व मॅट पाहत होता. त्यामुळे तो वेगाने चेंडूच्या जवळ गेला आणि त्याने चेंडू स्टम्पच्या दिशेने मारला. पण त्याचे दुर्दैव की तो चेंडू स्टम्पला लागला नाही. जर हा चेंडू स्टम्पला लागला असता तर ऋतुराज बाद होऊ शकला असता. कारण जेव्हा चेंडू स्टम्पला लागला नाही तेव्हा आपण ऋतुराजची विकेट गमावल्याचे भाव लखनौच्या खेळाडूंच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होते. त्यामुळे ऋतुराजची विकेट पहिल्याच चेंडूवर जाऊ शकली असती, हे त्यांच्या देहबोलीतून जाणवत होते. जर ऋतुराज यावेळी बाद झाला असता तर त्याला एकही धाव करता आली नसती.

# गावस्करांनी हार्दिकवर तोफ डागत मुंबई इंडियन्सला दाखवला आरसा

## गावस्कर यांनी स्पष्टपणे मुंबई इंडियन्सला वॉर्निंगच दिली

मुंबई । वृत्तसंस्था

**हार्दिक पंड्याचं नेमकं चाललंय तरी काय, हा प्रश्न आता सर्वांनाच पडला आहे. त्यामध्येच भारताचे माजी कर्णधार आणि समालोचक सुनील गावस्कर यांनी हार्दिकवर तोफ डागत मुंबई इंडियन्सला आरसा दाखवला आहे. आपल्या स्पष्टवक्तेपणासाठी गावस्कर ओळखले जातात. त्यामुळे गावस्कर यांनी स्पष्टपणे यावेळी मुंबई इंडियन्सला वॉर्निंगच दिली आहे.**





हार्दिकने जेव्हापासून मुंबई इंडियन्सचे कर्णधारपद स्विकारले आहे, तेव्हापासून तो जोरदार ट्रोल होत आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे हार्दिकच्या नेतृत्वाचा संघावरही वाईट परीणाम झाला आहे. मुंबईने या आयपीएलमध्ये आठ सामने खेळले आहेत आणि त्यांना पाच पराभव पत्करावे लागले आहेत. त्यामुळे आता त्यांचा प्ले ऑफचा मार्ग बिकट बनला आहे. त्यामुळे मुंबईच्या संघाचे आयपीएलमधील आव्हान संपुष्टात येणार असल्याचे म्हटले जात आहे. पण त्याचवेळी सुनील गावस्कर यांनी स्पष्ट शब्दांत मुंबई इंडियन्सला वास्तव दाखवलं आहे. गावस्कर यांनी स्टार स्पोर्ट्सवरील एका कार्यक्रमात सांगितले की, " मी २००८ सालापासून मुंबई इंडियन्सच्या संघाला फॉलो करत आहे. गेली १७ वर्षे मी मुंबई इंडियन्सच्या संघाला पाहत आलो आहे. या संघातील मोठे बदलही मी पाहिले. पण सध्याच्या घडीला हा संघ नेमका कोणता आहे, हेच मला कळत नाही. ज्या मुंबई इंडियन्सच्या संघाला मी ओळखत होतो, तो हा संघ नक्कीच नाही." मुंबई इंडियन्सच्या संघाची एक दबदबा होता, तो आता राहीलेला नाही, असेच दिसत आहे. गावस्कर यांनी ही गोष्ट दाखवून दिली आहे. कारण मुंबई इंडियन्सला पराभव काही नवीन नाहीत, पण संघातील वातावरण मात्र चांगलेच दिसत नाही आणि हीच गोष्ट गावस्कर यांनी निदर्शनास आणून दिली आहे. त्यामुळे गावस्कर यांनी न बोलता अप्रत्यक्षपणे मुंबई इंडियन्सच्या संघाला वॉर्निंगच दिली आहे. मुंबई इंडियन्सने जर कर्णधार बदलला नाही तर यापुढे अजून वाईट दिवस त्यांना पाहावे लागू शकतात, असे चाहतेही

### हार्दिकने मलिंगाचा केला अपमान...

मुंबई इंडियन्सचा संघ फलंदाजी करत असताना हार्दिक हा डगआऊटच्या इथे उभा होता. तिथेच मलिंगा आणि कायरन पोलार्ड बसले होते. यावेळी हार्दिकचा आर्विभाव असा होता की, मी कर्णधार आहे आणि मला कोणीतरी जागा द्यायला हवी. त्यामुळे पोलार्ड हा उठून जायला तयार होता. पण हार्दिक मलिंगाकडे पाहत होता. त्यावेळी मलिंगा तिथून उठून गेल्याचे पाहायला मिळाले. राजस्थानविरुद्ध मुंबई इंडयन्सचा सामना झाला. हा हार्दिक पंड्याचा १०० वा सामना होता. त्यामुळे मलिंगा त्याला खास जर्सी देत होता. यावेळी सर्व खेळाडूंना टाळ्या वाजवल्या. त्यानंतर मलिंगा हार्दिकला मिठी मारायला गेला, पण हार्दिकने त्याच्याकडे चक्क दुर्लक्ष केले. त्याने हे खास टी शर्ट दुसऱ्या खेळाडूकडे दिले आणि मलिंगाचा पुन्हा एकदा अपमान केला. यशस्वी जयस्वालच्या शतकाच्या जोरावर राजस्थान रॉयल्स संघाने मुंबई इंडियन्सवर नऊ विकेटनी विजय मिळवला. राजस्थानने मुंबईला ९ बाद १७९ धावांत रोखले. यानंतर राजस्थानने विजयी लक्ष्य १८.४ षटकांत एका विकेटच्या मोबदल्यात पूर्ण केले.